# पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,

ग्रामीण पोलीस मुख्यालय आडगाव, नाशिक - पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०

E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

**प्रेसनोट** दिनांक:- ०९/०४/२०१९

## डेबीट/क्रेडीट कार्डचे क्लोनिंग करून लाखोंची फसवणुक करणा-या गुन्हेगारास नाशिक ग्रामीण सायबर पोलीसांनी बिहार राज्यातील पटणा शहरातुन केले जेरबंद

---

कार्ड क्लोनिंगव्दारे ग्राहकांच्या डेबिट आणि क्रेडिट कार्डचा डाटा चोरी करून बोगस कार्डवरून लाखोंची फसवणुक करणा-या एका सराईत गुन्हेगारास नाशिक ग्रामीण सायबर पोलीसांनी बिहार राज्यातील पटणा शहरातुन ताब्यात घेतले आहे. नाशिक जिल्हयातील पिंपळगाव शहरात गेल्या महिन्यात फिर्यादी संतोष नाना पाचोरकर, वय ४५ हे युनियन बँकेचे ए.टी.एम.मध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते, सदर ठिकाणी अज्ञात ०२ हिंदी बोलणारे आरोपीतांनी त्यांचेसह इतर ०५ सामान्य नागरीकांचे लक्ष विचलित करून संबंधीत बँक खातेदारांचे अकाऊंट मधुन रोख रकमेची फसवणुक केली होती. सदर बाबत पिंपळगाव बसवंत पोलीस ठाणेस फसवणुकीसह माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. नाशिक जिल्हयातील तालुक्यांचे ठिकाणी असलेले ए.टी.एम. सेंटर मधुन अशा प्रकारचे गुन्हे करणारे टोळीने अनेक नागरीकांचे पैसे फसवणुक करून परस्पर काढुन घेतल्याच्या तक्रारी सायबर पोलीस ठाणेस प्राप्त झाल्या होत्या. नाशिक ग्रामीण जिल्हयासह राज्य व देशातील विविध ठिकाणी ए. टी.एम.कार्ड क्लोनिंग संदर्भात वाढत असलेल्या सायबर गुन्हयांकडे विशेष लक्ष देवुन नाशिक ग्रामीण जिल्हयाच्या **मा.पोलीस अधीक्षक डॉ. आरती सिंह मॅडम** यांचे मार्गदर्शनाखाली नाशिक ग्रामीण सायबर पोलीसांनी वरील गुन्हयांचा समांतर तपास सुरु केला.

सायबर पोलीस ठाण्याचे **पोलीस निरीक्षक श्री. सुभाष अनमुलवार** व त्यांचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी जिल्हयातील ए.टी.एम.कार्डचे फसवणुकीबाबत दाखल असलेल्या गुन्हयांचे घटनास्थळांवर तातडीने भेटी दिल्या. सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांची गुन्हा करण्याची पध्दत, तसेच विविध ए.टी.एम. सेंटरवरील सी.सी. टी.व्ही. फुटेज व तांत्रिक माहितीची पडताळणी करून तपास पथकाने अज्ञात आरोपीतांचा शोध सुरु केला. दरम्यान विविध घटनास्थळांवरील प्राप्त फुटेजची पाहणी केल्यानंतर त्यातील दोन संशयीत आरोपीतांनी ब-याच ठिकाणांवर एकाच प्रकारे फसवणुक करून गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून सायबर पोलीसांनी जलद गतीने तपासाची चक्रे फिरवुन बिहार राज्यातील पटना शहरातील बांकीपुर परिसरात नाशिक ग्रामीण सायबर पोलीसांनी सलग ०३ दिवस तळ ठोकुन जामुन गल्लीतील हसिबुद्दीन लॉज परिसरातुन संशयीत नामे **१) जावेद वजीद खान, वय २४, रा. मंझौली, बिरिज बिहारी हाई विद्यालय, दसरथपुर, जि.गया,** हल्ली रा. हसिबुद्दीन लॉज, जामुन गल्ली, सब्जीबाग, बांकीपुर, पटना राज्य बिहार यास शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले संशयीतास विश्वासात घेवुन चौकशी केली असता, त्याने व त्याचा साथीदार नामे **२) मोहम्मद जावेद उर्फ एहसान खान**, रा. मंझौली, बिरिज बिहारी हाई विद्यालय, दसरथपुर, जि.गया, राज्य बिहार याचेसह महाराष्ट्र राज्यातील विविध शहरांमध्ये सामान्य नागरीकांचे ए. टी.एम.कार्ड क्लोनिंग करून **परस्पर लाखो रूपयांची फसवणुक करून पैसे काढुन घेतले तसेच ऑनलाईन शॉपिंग आणि बँक खात्यांवर पैसे ट्रान्सफर** केले असल्याची **कबुली** दिली आहे. सदर आरोपीने कबुली दिलेवरून नाशिक जिल्हयातील पिंपळगाव बसवंत, कळवण, मालेगाव सह महाराष्ट्रातील विविध जिल्हयांमधील पोलीस ठाण्यांचे मध्ये दाखल असलेले गुन्हे व तक्रारी उघडकीस आलेल्या आहेत.

सदर गुन्हयातील ताब्यात घेतलेला **आरोपी नामे जावेद वजीद खान** हा माहे ऑक्टोबर २०१८ मध्ये नाशिक जिल्हयात त्याचे साथीदारांसह आला होता. त्यावेळी त्याने शिर्डी शहरात मुक्काम करून नाशिकसह लगतचे जिल्हयांची पाहणी केली होती. त्यानंतर सदर आरोपी व त्याचा **साथीदार मोहम्मद जावेद** यांनी माहे जानेवारी पासुन नाशिक जिल्हयातील विविध शहरांमधील बँकाचे ए.टी.एम.सेंटरवर गर्दीचा फायदा घेवुन पैसे काढणारे ग्राहकांचे

पाठीमागे उभे राहुन पैसे विड्रॉल करतांनांचे व्हिडोओ मोबाईलमध्ये रेकॉर्ड करत असे, त्यानंतर लॉजेसवर जावुन रात्री सदर व्हिडीओ लॅपटॉपमध्ये अपलोड करून ग्राहकांचे ए.टी.एम.कार्डवरील १६ डिजीट नंबर, व कार्डवरील माहिती पिनसह संकलीत करत होते. त्यातील ज्या ग्राहकांचे कार्डनंबर स्पष्ट दिसुन आले, त्या **ग्राहकांचे कार्डचे सॉफ्टवेअर व क्लोनिंग मशिनव्दारे बनावट ए.टी.एम.कार्ड मध्ये क्लोन** करून ऑनलाईन शॉपिंग, कॅश विड्रॉल व त्यांचे इतर खात्यांवर पैसे ट्रान्सफर करून घेतले असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. ताब्यात घेतलेला **आरोपी जावेद खान** याचे कब्जातुन ***डेल कंपनीचा लॅपटॉप, क्लोनिंग मशिन, कार्ड स्किमर, विविध बॅकांचे २० ए.टी.एम.कार्ड, १६ ब्लॅंक डमी क्लोन कार्ड, ०३ स्मार्टफोन, सॉफ्टवेअरच्या ३ सी.डी.*** तसेच सदर आरोपीने फसवणुक करून मिळविलेल्या पैशातुन खरेदी केलेली ***बजाज पल्सर २२० सी सी मोटरसायकल*** असा सुमारे **०३ लाख रूपये किंमतीचा** मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. तसेच आरोपी जावेद खान याचे **पंजाब नॅशनल बॅक** खात्याचा शोध घेवुन खात्यावरील रोख रक्कम ***अकरा लाख छपन्न हजार सातशे त्रेचाळीस रुपये सिझ*** करण्यात आले आहे. सदर आरोपीस **पिंपळगाव बसवंत पोलीस ठाणेकडील** गुन्हयात अटक करण्यात आली असुन मा.न्यायालयाने सदर गुन्हयाचे गांभीर्य व व्याप्ती पाहुन केलेला तपास विचारात घेवुन नमुद अटक आरोपी व त्याचे साथिदार यांनी संपुर्ण भारतभर अशा प्रकारे कार्ड क्लोनिंगव्दारे फसवुणक करुन बॅकिंग सर्व्हिसेसची सिक्युरिटी तोडुन गुन्हे करुन बॅकिंग व्यवस्था धोक्यात आणलेली आहे त्यामुळे सर्वसामान्य जनतेचा बॅकिंग व्यवस्थेवरील विश्वास ढासाळत असल्याने तपासी अधिकारी व सायबर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांनी केलेले मागणीप्रमाणे सलग **१४ दिवस पोलीस कस्टडी रिमांड** दिलेली आहे.

सदर आरोपी **जावेद खान व** त्याचा साथीदार **मोहम्मद जावेद** हे मुळचे जिल्हा गया, राज्य बिहार येथील रहिवासी असुन पटना शहरात जामुन गल्ली परिसरात विद्यार्थी असल्याची बतावणी करून भाडे तत्वावर राहत होते. आरोपी जावेद खान हा बी.ए.ग्रॅज्युएट असुन तो बिहार पब्लिक सर्व्हिस कमिशन व स्टाफ सिलेक्शन कमिशनच्या स्पर्धा परिक्षा देत होता. दरम्यान दोघांनी मिळुन इंटरनेटव्दारे सविस्तर माहिती घेवुन तसेच ॲमेझॉन ऑनलाईन शॉपिंग ॲपव्दारे कार्ड स्किमर व क्लोनिंग मशिन खरेदी करून देशातील विविध शहरांमधील बॅकांचे ए.टी. एम.मध्ये जावुन कार्ड क्लोनिंगव्दारे पैसे काढुन सामान्य नागकारीकांची फसवणुक केली असल्याचे निष्पन्न झाले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाच्या **मा.पोलीस अधीक्षक डॉ. आरती सिंह मॅडम**, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती **शर्मिष्ठा वालावलकर मॅडम** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **सायबर पोलीस** ठाण्याचे **पोलीस निरीक्षक श्री. सुभाष अनमुलवार, पोउनि श्री. कल्पेश दाभाडे**, पोकॉ प्रमोद जाधव, परिक्षीत निकम, प्रकाश मोरे, सुनिल धोक्रट यांचे पथकाने बिहार राज्यातील पटना शहरातुन सदर गुन्हयातील आरोपीस ताब्यात घेवुन गुन्हा उघडकीस आणलेला आहे. सदर गुन्हा उघडकीस आणणेसाठी तांत्रिक विश्लेषण विभागाचे पोकॉ हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम यांचे पथकाने विशेष सहकार्य केले असुन सायबर पोलीस ठाण्याचे सपोनि श्री. तुषार अढावू, पोकॉ विकास टेकुळे, मपोना सोनाली पाटील, मपोकॉ प्राजक्त सोनवणे, सरिता अक्कर यांचे पथकाने समांतर तपासात मदत केली आहे.

**नागरीकांना आवाहन :-**

जिल्हयातील सर्व नागरीकांना सायबर पोलीस ठाण्यातर्फे आवाहन करण्यात येते की, बॅक ए.टी.एम. मध्ये पैसे काढतांना ए.टी.एम.सेंटरमध्ये एकाच व्यक्तीने प्रवेश करावा, पैसे काढतांना पाठीमागे अनोळखी व्यक्ती अथवा कोणीही असल्यास त्यास तेथे थांबण्यास प्रतिबंध करावा, ए.टी.एम.स्वाईप करतांना स्लॉटवर इतर कोणते बनावट डिव्हाईस लावलेले आहेत काय याची खात्री करावी, पैसे विड्रॉल केल्यानंतर कॅन्सल व क्लीअरचे बटन प्रेस करूनच ट्रान्झॅक्शन पुर्ण झाल्यावरच बाहेर पडावे, तसेच कोणीही अनोळखी इसम फोनव्दारे कॉल करून अमिष दाखवुन बॅक खात्यांची माहिती घेत असल्यास माहिती देवु नये, आपले मोबाईलवर मॅसेजव्दारे आलेला ओ.टी.पी., ए. टी.एम. पिन /सी.व्ही.व्ही. नंबर कोणासही शेअर करू नये, अनोळखी संकेतस्थळे तसेच मोबाईल वर अमिष दाखविणा-या वेब लिंकवर क्लिक करू नये. अशा प्रकारच्या फसवणुक झाल्यास तात्काळ नजीकचे पोलीस ठाणे, बॅक शाखा व नाशिक ग्रामीण सायबर पोलीस ठाणेस (०२५३-२२००४०८) संपर्क साधावा.